***********************************************

## ××××× प्रकरण तिसरे ×××××

## ××××× महानुभावीय व्याकरणकार ×××××

***********************************************

## प्रकरण तिसरे

## महानुभावीय व्याकरणकार

समाजव्यवहारास साहयभूत अशी मौखिक प्रतिकांनी बनलेली एक पध्दत म्हणजे भाषा होय. एकाच भाषेच्या अनेक बोलीभाषा असतात. कोणत्याही भाषेस स्थैर्य प्राप्त होऊ लागले की, त्या भाषेच्या व्याकरणाची आवश्यकता भासू लागते. एकाच भाषेच्या निरनिराळ्या भागात त्या भाषेची भिन्न-भिन्न स्वरूपे पाहवयास मिळतात. भाषा दीर्घकाळपर्यंत प्रचारात राहिली की, हळूहळू तिला नियमबध्द स्वरूप प्राप्त होते. एक शिष्टसंमत स्वरूप तिला प्राप्त होते. हे शिष्टसंमत स्वरूप लिखित स्वरूपात आले की त्या भाषेचे व्याकरण तयार होते. हे स्वरूप सर्वसाधारण व सर्वांना समजणारे असे असते. ते सर्वमान्य झाले की, त्यास नियमाचे स्वरूप प्राप्त होते. या भाषिक नियमांशी सुसंगत जे असेल ते शुध्द आणि विसंगत असेल ते अशुध्द असे मानण्याची प्रथा त्यावेळी पडते. भाषेचे लिखित स्वरूपातील हे शिष्टसंमत स्वरूप सर्वमान्य झाले तरीही, त्या भाषेच्या निरनिराळ्या भागात बोलीभाषा असतातच. पण हळूहळू त्यांना गौणत्व येते व त्या लोप पावू लागतात. हे तयार झालेले नियम म्हणजेच भाषेचे व्याकरण, भाषेला नियंत्रित करून एकरूपात आणण्याचा प्रयत्न करते.

### व्याकरण म्हणजे काय ?

भाषा स्थीर होऊ लागली की तिचे व्याकरण तयार होते. भाषेच्या स्वरूपाबद्दल विचार करणारी जी शास्त्रे आहेत. त्यांच्यात व्याकरणशास्त्राचाही समावेश आहे. भाषेचे शिष्टसंमत स्वरूप निश्चित करण्यासाठी व त्यांना नियमांचे रूप देऊन भाषेला नियंत्रित करण्यासाठी व्याकरण तयार होते. याचा अर्थ भाषा स्थीर झाल्यानंतरच व्याकरणाचा जन्म होतो असे नाही तर भाषेबरोबरच तिचे व्याकरणही जन्मते. मात्र त्याचे स्वतंत्र अस्तित्व त्या भाषेला प्रौढत्व आल्यानंतरच जाणवते. व्याकरणकारांच्या प्रयत्नातून ते पाहता येते.

भाषेचे व्याकरण म्हणजे नेमके काय हे अनेकांनी सांगितले आहे, त्याचा अर्थ स्पष्ट केला आहे.

"ग्रामर म्हणजे विद्या शिकवणारे शास्त्र" असा अर्थ (Grama) या लॅटिन शब्दापासून निर्माण होतो. "शुध्द रीतीने बोलणे व लिहिणे म्हणजे व्याकरण" अशी व्याकरणाची व्याख्या बाळशास्त्री जांभेकरांनी केली तर "व्याकरण हे भाषेचे शास्त्र आहे" अशी ढोबळ व्याख्या मो.के.दामले यांनी केली आहे. "सुशिक्षित लोक कोणतीही भाषा कोणत्या रीतीने बोलतात किंवा लिहितात, हे ज्या शास्त्राने सांगितलेले असते त्यास त्या भाषेचे व्याकरण म्हणतात" असा सविस्तर अभिप्राय रा.भि.जोशी यांनी दिला आहे.[१] म.पा.सबनीस, ग्रामोपाध्ये, कालेलकर, मंगरूळकर यांनी व्याकरणाच्या ज्या व्याख्या केल्या, त्या व्याख्यांचा आशय असा दिसून येतो की "भाषेचा उपयोग म्हणजेच भाषिक व्यवहार कोणत्या नियमांना अनुसरून करावा, याबाबतची माहिती ज्या शास्त्रात केलेली असते ते व्याकरणशास्त्र होय."

## भाषेला व्याकरणाची आवश्यकता -

व्याकरणाचे महत्त्व, कार्य आणि उपयुक्तता पाहिल्यास भाषेला व्याकरणाची गरज का असते हे स्पष्ट होते. भाषेचे व्याकरण त्या भाषेला एक विशिष्ट निश्चित रूप देऊन तिला नियंत्रित करीत असते. या स्वरूपापासून दूर जाणा-यांची भाषा अशुध्द समजली जाते. भाषिक व्यवहारासाठी व्याकरणाची माहिती अत्यंत आवश्यक आहे, असे म्हणणारे जसे आहेत तसे व्याकरणाचा तिरस्कार करणारेही लोक प्राचीन काळापासून आहेत. "एक वेळ लाकडे फोडणे बरे पण मूर्ख होण्याची ही विद्या नको"असा व्याकरणाचा कुचकामीपणा सांगणारा अभिप्राय "लोकहितवादींनी" दिला आहे.[२] "परभाषिकांसाठी भाषेचे व्याकरण असावे" असे म्हणणा-यांनाही निरूत्तर करण्यासाठी म.पा.सबनीसांनी म्हटले आहे - "परभाषीय माणूस अनुकरणानेसुध्दा तेथील भाषा सफाईदारपणे बोलू शकतो, मग त्याला व्याकरणच कशाला शिकले पाहिजे[३]."

भाषेच्या व्याकरणाविषयी अशी नकारार्थी मते मांडली गेलेली असली तरी, व्याकरणाची आवश्यकता नाकारून चालणार नाही. मौखिक आणि विशेषतः लिखित स्वरूपातील भाषिक व्यवहार सुरळीत चालण्यासाठी भाषेच्या व्याकरणाची आवश्यकता असते. एखादी व्यक्ती बोलते तेव्हा त्याच्या बोलण्याच्या लकबी, चढउतार, रचना इ.कारणांनी त्याच्या बोलण्याचा उद्देश समजून घेतला जातो. पण हाच मजकूर जेव्हा लिखित स्वरूपातील

वाचावयाचा असेल तेव्हा, व्याकरणाशिवाय त्याचे वाचन केले तर लेखक-वाचक यांच्यामध्ये समान भूमिकेवर त्या शब्दांच्या अर्थाचे आकलन होईलच, अशी खात्री देता येत नाही· असे आकलन होण्यासाठी लेखक आणि वाचक समान पातळीवर यावे लागतात आणि ते तसे येण्यासाठी व्याकरणयुक्त लिखाणाची आवश्यकता असते·

शब्दांना लागणारे विविध प्रत्यय, त्यांचे होणारे वेगवेगळे विकास व वाक्यांची विशिष्ट प्रकारची रचना यांच्यामुळेच भाषेला अर्थपूर्णता येते· अन्यथा प्रत्ययविहीन आणि विकाराशिवाय शब्दांचा कसाही क्रम लावून वाक्ये लिहिली तर त्यातून कुणालाच अर्थबोध होणार नाही· म्हणून असे प्रत्यय, विकार व रचनाविषयक संकेत शोधून काढून ते संगतवार मांडून दाखविणे हे व्याकरणाचे खरे कार्य आहे· विशिष्ट पदरचनेमुळे विशिष्ट अर्थाचा संकेत कसा निर्माण होतो हे दाखविण्याचे कार्य व्याकरणाला करावे लागते· भाषा हळूहळू बदलत असते म्हणून तिला शुध्द व आदर्श स्वरूपात तिचे व्याकरणच ठेवू शकते· भाषेला चढउतार व विशिष्ट लकबी असतात· प्रत्येक भाषेचा एक विशिष्ट घाट असतो· तो विरामचिन्हांच्या साहयांनी वाचकापर्यंत पोहोचविणे केवळ व्याकरणामुळेच शक्य आहे· वाक्सुंदरीच्या पदन्यासाची ओळख तिच्या रसिकांना व्याकरणामुळे होते· व्याकरणाच्या आवश्यकतेबाबत मंगरूळकर म्हणतात, "संगीतात जशी लय वा ठेका महत्त्वाचा असतो त्याप्रमाणे कोणत्याही भाषेत त्या भाषेच्या व्याकरणाचे महत्त्व असते· लोकसमूहाच्या प्रमाणभाषेतील वर्ण, शब्द, शब्दांचे परस्परसंबंध व त्यातून होणारे वाक्य यांच्यातील अंतर्गत संगती, नियम किंवा लय शोधून मांडणारे शास्त्र म्हणजे व्याकरण होय"[१] व्याकरणाच्या महत्त्वाबाबत असा सविस्तर अभिप्राय त्यांनी दिला आहे·

**व्याकरणाचे स्वरूप -**

जेव्हा कोणत्याही भाषेस स्थैर्य प्राप्त होऊ लागते तेव्हा त्या भाषेचे व्याकरण तयार करण्याची गरज भासू लागते· त्या भाषेस काही नियम असावेत अशी जाणीव होऊ लागते· कोणतीही भाषा जेव्हा दीर्घकालपर्यंत प्रचारात राहते तेव्हा हळूहळू तिचे स्वरूप नियमबध्द होत राहते आणि त्या भाषेचे व्याकरण तयार होते· प्रत्येक भाषेत अनेक बोलीभाषा असतात· भाषेच्या क्षेत्रातील निरनिराळ्या भागात त्या बोलल्या जातात· या अनेक बोलीभाषांपैकी एखाद्या बोलीचे स्वरूप सर्वसाधारण व सर्वांना समजेल असे असते· अशा शिष्टसंमत बोलीभाषेलाच प्रमाणभाषेचा दर्जा प्राप्त होऊन प्रथम तिचे व्याकरण

तयार होते. या व्याकरणात भाषेतील विविध प्रकार व तिची विविध रूपे सांगितली जातात. हे व्याकरण एकदा ग्रंथरूप होऊन सर्वमान्य झाले की, त्यास नियमांचे स्वरूप प्राप्त होते. एकदा नियम तयार झाले की, या नियमांशी सुसंगत असेल ते शुध्द व विसंगत असेल ते अशुध्द मानण्याची तिथून पुढे प्रथा पडते. त्यानंतरचे ग्रांथिक लेखन या प्रमाणभाषेच्या व्याकरणाच्या नियमांनुसारच होत राहते. या भाषेच्या ज्या इतर बोलीभाषा असतात, त्या सर्व बोलीभाषांना नियंत्रित करून एकत्रित आणण्याचे काम हे व्याकरणाचे नियम करीत राहतात. या पध्दतीने व्याकरण तयार होऊन व्याकरणाचे स्वरूप निश्चित होते व त्यावरून भाषेचे स्वरूपही स्पष्ट होते.

मराठी भाषेची व्याकरण-परंपरा -

हिंदुस्थानमध्ये इ.स.च्या सातव्या शतकात विविध प्रादेशिक भाषा अस्तित्वात आल्याचे म्हटले जाते. मराठी भाषेचा उत्पत्तिकालही सातव्या शतकातीलच मानला जातो. बाराव्या-तेराव्या शतकात तत्कालीन मराठी भाषेत ज्ञानेश्वरीसारखे, भाषेच्या दृष्टीने प्रगल्भ ग्रंथ निर्माण झाले. याचा अर्थ मराठी भाषा, हे ग्रंथ लिहिण्यापूर्वीच परिपक्व व प्रौढ स्वरूपात असली पाहिजे. प्राचीन काळातील तत्कालीन साहित्यिकांना मराठी भाषेचे व्याकरण तयार करण्याची आवश्यकताही भासली असली पाहिजे. आणि तशाप्रकारचे प्रयत्नदेखील त्यांनी तेव्हा केले असले पाहिजेत. परंतु ज्ञानेश्वरांच्या पूर्वीच्या काळातील व्याकरणलेखनविषयक प्रयत्नही अज्ञातच आहेत. महानुभाव पंथातील काही ग्रंथकारांची व्याकरणे व गिरिधर स्वामींचे श्लोकबध्द "व्याकर्ण" यातून प्राचीन मराठी व्याकरणाचे स्वरूप काही प्रमाणात स्पष्ट होते.

मराठी भाषेच्या व्याकरणाची आवश्यकता पहिल्यांदा भारतात आलेल्या पाश्चिमात्यांना भासू लागली. इंग्रज, पोर्तुगीज हिंदुस्थानात येऊन स्थायिक झाले. स्वतःचे राज्य इथे स्थापन करावयाच्या उद्देशाने, राज्यकारभार चालविण्याच्या उद्देशाने व स्वधर्माचा प्रचार करावयाच्या उद्देशाने त्यांनी हिंदुस्थानातील प्रादेशिक भाषा शिकण्याचा प्रयत्न केला. भाषा शिकण्यासाठी त्या भाषेचे व्याकरण प्रथम शिकणे आवश्यक आहे. या गरजेपोटीच इंग्रजी काळात मराठी भाषेचीही व्याकरणे लिहिली गेली. मराठी भाषेची प्रारंभकालीन व्याकरणे मिशन-यांसाठी इंग्रजी व पोर्तुगीज भाषांमधून लिहिली गेली. पोर्तुगीज मिशन-यांनी धर्मप्रसारार्थ ही व्याकरणे लिहिली होती.[५] सुरूवातीची ही सर्व व्याकरणे

पाश्चात्य भाषेमध्येच होती·

अहमदनगर येथील अमेरिकन मिशनने इ·स· १८५८ मध्ये सर्वप्रथम मराठी भाषेचे व्याकरण मराठी भाषेत लिहिले· या व्याकरणात शब्दांच्या जाती, विभक्ती, सामान्यरूप, पुरुष, वचन, लिंग, काळ, रूपभेद, वाक्यांचे प्रकार इ·घटकांवर लेखन केले आहे·[६] इंग्रजी अंमलात मराठी व्याकरण लिहिणा-यांत वाढ झाली· याच काळात जांभेकर, फडके, दादोबा, टिळक आदींनी मराठीची व्याकरणे लिहिली· कृष्णाशास्त्री चिपळूणकरांनी इ·स· १८६५। ६६ मध्ये "मराठी व्याकरणावर निबंध" या मथळ्याखाली २५ निबंध लिहून मराठीच्या व्याकरणावर विस्तृत चर्चा केली· तसेच "दक्षिणा प्रैझ कमिटीने" मराठी भाषेचा व्याकरणग्रंथ लिहिला जाण्यासाठी जाहिरातही दिली होती· या जाहिरातीत "मराठीचे व्याकरण कसे असावे" याचे विवेचन केले आहे· यानंतर गोडबोले, भिडे, नवलकर, जोशी, गुंजीकर यांनी मराठीची व्याकरणे लिहिली तर लोकहितवादी, आचार्य, वैद्य, थत्ते, परांजपे, बनहट्टी या विव्दान साहित्यिकांनी मराठी व्याकरणावर अधिक चर्चा केली·

आजच्या शास्त्रीय मराठी व्याकरणाचे विकसित रूप एकाएकी निर्माण झालेले नाही तर मराठी भाषेची व्याकरणपरंपरा मराठी वाङ्मयाइतकीच प्राचीन आहे· अव्वल इंग्रजी काळापासून मराठी व्याकरण नावारूपाला आले असले तरी मराठी व्याकरणाचा पाया थेट महानुभाव पंथाच्या वाङ्मयापर्यंत जाऊन पोहोचतो· ज्ञानेश्वरांच्या काळात किंवा तत्पूर्वी या पंथातील साहित्यिकांनी व्याकरणाचे महत्त्व जाणून घेऊन तत्कालीन मराठी भाषेचे व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते· सध्या उपलब्ध असलेल्या व्याकरणग्रंथांचा विचार केल्यास, मराठी भाषेच्या आद्य व्याकरणकाराचा मान तेराव्या शतकात महानुभाव पंथात होऊन गेलेल्या ग्रंथकारांना द्यावा लागतो· कवीश्वर व्यास, आनेराज बास, पं·भीष्माचार्य व पं·विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर या चार महानुभावीय साहित्यिकांनी व्याकरण-रचना केल्याचे उल्लेख प्राचीन व्याकरण-परंपरेत आढळतात· यांच्यातील कवीश्वर व्यास व पं·विश्वनाथ वर्धनस्थ यांचे व्याकरण-ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या व्याकरण-रचनेचे स्वरूप आज निश्चितपणे समजू शकत नाही·[७]

महानुभाव पंथातील प्रसिध्द ग्रंथकार कवीश्वर व्यास उर्फ भास्करभट्ट बोरीकर यांनी "महाराष्ट्र भाषाभाष्य" किंवा "सुभाष्य" किंवा "भाषाघोष" अशा काहीतरी नावाचे मराठी भाषेचे व्याकरण लिहिले असल्याचा उल्लेख सापडतो· पं·आनेराजबास उर्फ गोपाळ

पंडित यांनी "लक्षणरत्नाकर" नावाचा व्याकरणप्रबंध लिहिला· पं·भीष्माचार्य यांनी "नाम-विभक्ती" व "पंचवार्तिक" हे दोन मराठी व्याकरणग्रंथ लिहिले· महानुभावीय व्याकरणकारां-संबंधी पुढील पद्यपंक्तीमध्ये उल्लेख आढळतात·

"माहींभट्टी व्याकर्णावरी। संस्कृत भाषा मंजरी। रचिते जहाले केशवसूरी। परमार्थ हेतु ।। १ ।।
मूळ व्याकरणाचे नि आधारे। सुभाषनिबंधु बोलिला कविश्वरे।
जो छपन्न भाषेशी होऊन उरे । महाराष्ट्रीये ।। २।।
भाषा प्रबोध, भाषा प्रदीपिका । गौड महाराष्ट्री पीठिका ।
अष्टौ व्याकरणाचा अवाका । उमचविला ।। ३।।
श्री भास्करे गोपाळा आज्ञापिले । ते लक्षण रत्नाकर बोलिले ।
मग पंचवार्तिक निरोपिते जहाले । भीष्ममुनि ।।४।।
लिंगत्रय विवंचना । दृष्टातोपपत्ति न्याय प्रमाणा ।
उपपत्ति अनुपपत्ति शङ्कार्ण । दामोदरू प्रणितु ।।५।।
ऐसे भाषा निबंध । महात्म मार्गीचे प्रसिध्द ।
लिड्गत्रय पदार्थभेद । कवीश्वरकृत ।।६।।"[८]

तुघलकाच्या स्वारीत महानुभावीय ग्रंथांचा नाश झाला असे महानुभावीय वृध्दान्वयात सांगितले आहे· "विशेषासहित देह त्यजीयेले । हीरोनिया नेले । पुस्तकांते" असा उल्लेख कवीश्वर वंशवर्णनातही आहे· यावरून हे सिध्द होते की, एकेकाळी केव्हातरी महानुभाव पंथाचे ग्रंथ नष्ट झाले होते· पुन्हा त्यांचे पुनरूज्जीवन झाले असले पाहिजे· त्यामुळे बरेच महानुभावीय साहित्य काळाच्या पडद्याआड गेले असावे·

## महानुभावीय व्याकरणकार -

### कवीश्वर व्यास -

महानुभाव पंथातील चार व्याकरणकारांपैकी भास्करभट्ट बोरीकर यांनी पहिल्यांदा मराठीचे व्याकरण लिहिले· भास्करभट्टाचे मूळचे नांव भानुभट· परभणी जिल्हयातील बोरी गावचे ते राहणारे होते· महानुभाव पंथात येण्यापूर्वी कलंकी मार्गातील "केशवाचार्य" हे त्यांचे गुरू होते· एका प्रसंगाने भास्करभट्टाची नागदेवाचार्यांशी भेट झाली· त्याचवेळी प्रभावित होऊन नागदेवाचार्यांकडून त्यांनी पंथाची दीक्षा घेतली· पुढे केशवाचार्यांनाही पंथात घेण्यासाठी त्यांनी नागदेवाचार्यांना विनंती केली होती·

नागदेवाचार्यांनी किंवा भटोबासांनी भास्करभटांना "कवीश्वर" म्हणून संबोधले आणि ते "कवीश्वर व्यास" झाले· नागदेवाचार्यांच्या पाचशे शिष्यांपैकी ते सर्वश्रेष्ठ शिष्य मानले जातात· भास्करभट्ट हे दिसायला सुंदर होते पण गुरूआज्ञेनुसार ते ठिगळांची म्हणजेच दशांची वस्त्रे परिधान करीत·

भास्करभटाकडे विव्दत्ता असल्यामुळे पंथाचे तृतीय आचार्य होण्याचा मान त्यांना मिळाला· कवीश्वर आम्नायाचे ते आद्य प्रवर्तक होत· संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते· तसेच शीघ्रकवित्वाबद्दल त्यांची प्रसिध्दी होती· बुध्दीची तीव्रता असल्यामुळे वादविवाद करणे त्यांना आवडत असे· चर्चेतून पंडितांचा पराभव करण्यात त्यांना आनंद वाटत असे· आपले प्रथम गुरू केशवाचार्य यांना तसेच पंथाची टवाळी करणा-या एका संन्याशाला त्यांनी वादविवादात पराभूत केले होते· नागदेवाचार्यांचा विरोध असतानाही पिंपळेश्वराच्या मंदिरात पैठणहून आलेल्या एका विव्दानासही त्यांनी चर्चेत पराभूत केले· कधी कधी मर्यादा ओलांडून आपले गुरू नागदेवाचार्य यांच्याबरोबरही ते वाद घालीत· मात्र वादविवादात जिंकूनही आपली गुरूवरची श्रध्दा त्यांनी ढळू दिली नाही किंवा विनय सोडला नाही·

महानुभाव पंथातील इतर साहित्यिकांच्या लेखनप्रेरणेप्रमाणेच भास्करभटाच्या लेखनापाठीमागचीही प्रेरणा होती· पंथनिष्ठा, पंथप्रचार व श्रीकृष्णभक्ती या प्रेरणेने त्यांनी लेखन केले· भास्करभटांनी "गद्य" आणि "पद्य" अशा साहित्याच्या दोन्ही क्षेत्रात लेखन केले· शृंगाररसातील उत्कृष्ट काव्यरचनेमुळे भटोबासांनी त्यांना "शृंगारिया कवी" अशा शब्दात गौरविले· त्यांचा "शिशुपालवध" हा ग्रंथ शृंगाररसप्रधान झाल्यामुळे गुरूआज्ञेनुसार त्यांनी "उध्दवगीता" हा निवृत्तिपर ग्रंथ लिहिला·

भास्करभटाच्या नावावर अनेक ग्रंथांची नोंद आढळते पण विविध ठिकाणच्या नोंदीत एकवाक्यता नाही· शिशुपालवध, एकादशस्कंध टीका, पूजावसर, चौपद्या, ईशस्तुती, विरहाष्टक, चक्रपाणिचरित्र, दत्तात्रेयचरित्र, श्रीकृष्णचरित्र व गीताटीका असे दहा ग्रंथ भास्करभटाच्या नावावर असल्याचे महाराष्ट्र सारस्वतात सांगितले आहे· यांतील सहा ग्रंथ गद्य असून चार पद्य स्वरूपात आहेत· "वृध्दाचार" कर्त्यांच्या मते शिशुपालवध, एकादशस्कंधटीका, नरविलापस्तोत्र, पूजावसर (संस्कृत) व पूजावसर (मराठी) या पाचच ग्रंथांचे कर्तृत्व भास्कराकडे जाते·[९] "अन्वयस्थळ"कारांनी मात्र भास्करभटाकडे एकूण बारा ग्रंथांचे कर्तृत्व दिले आहे·[१०] यातील काही ग्रंथ संस्कृत भाषेत तर काही मराठी भाषेत

असल्याचे ते सांगतात. "वृध्दाचार" व "वृध्दान्वय" यातील उल्लेखांचा विचार करता, शिशुपालवध, एकादशस्कंध, नरविलापस्तोत्र व संस्कृत श्लोकबध्द पूजावसर या चार ग्रंथलेखनाविषयी त्यांच्यात एकवाक्यता आढळते, आणि हे ग्रंथ इ.स. १३०८ च्या सुमारास लिहिले असल्याचे सांगितले जाते.[११]

स्वतंत्र कल्पनाशक्ती या कवीश्वरांच्या काव्यात शृंगाराचा उत्कट आविष्कार जसा दिसतो तशीच अंतःकरणातील उत्कट भक्तीही दिसते. चित्तवेधक अलंकारयोजना व हृद्य वर्णनशैली योजिणा-या पंथात होऊन गेलेल्या सर्व कवींमध्ये अग्रपूजेचा मान भास्करभटांकडे जातो. त्यांची वाणी इतकी रसाळ की ती ऐकून भटोबासाचे अंतःकरण द्रवत असे, तर पाण्याला जाणा-या स्त्रीयाही ती गोड वाणी ऐकण्यास क्षणभर थांबत. पांडित्याचा प्रकर्ष आणि "शीघ्रकवित्त्व" या गुणांमुळे एका प्रसंगी, एकच श्लोक त्यांनी दहा प्रकारांनी वाखाणून दाखविला व स्वतःची ओळखही एका श्लोकातूनच करून दिली.

महानुभावीय व्याकरणकारांची माहिती देताना मोने यांनी "पंचवार्तिकात" भास्करभटास मराठीचा आद्य व्याकरणकार बनविले आहे. पण "भास्कराने व्याकरणावर रचना केल्याचे कोठेच दिसत नाही" असा आक्षेप वि.ल.भावे यांनी घेतला आहे.[१२] भास्कराचे पिता अनंताचार्य यांच्याजवळ काव्य-व्याकरणाचा त्यांचा अभ्यास झाला असल्याचा उल्लेख डॉ.वसंत जोशी यांनी आपल्या ग्रंथात केला आहे.[१३] महाराष्ट्र शब्दकोषातही "कवीश्वर व्यास यांचे महाराष्ट्र भाषाभाष्य अथवा सुभाष्य अशा काहीतरी नावाचे एक मराठी भाषेचे व्याकरण होते" असा उल्लेख त्यांच्या वाड्मयात असल्याचे सांगितले आहे.[१४] यावरून भास्करभट्ट बोरीकर हे व्याकरणकार असावेत याला पुष्टी मिळते. पण तुघलकाच्या काळात एकदा महानुभाव पंथाचे साहित्य नष्ट झाल्याचा उल्लेख सापडतो. कदाचित त्यावेळी किंवा सांकेतिक लिपीत ग्रंथ ठेवण्याच्या पंथीयांच्या वृत्तीमुळे अगर अन्य एखाद्या कारणाने हा ग्रंथ कायमचा नजरेआड झाला असावा. आज तो व्याकरण-ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे एक "व्याकरणकार" म्हणून भास्करभटाची अधिक ओळख होऊ शकत नाही.

<u>आनेराज बास</u> -

महानुभाव पंथातील एक व्याकरणकार म्हणून पं.आनेराज बास उर्फ गोपाळ पंडित यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. पं.आनेराज बासांचा महानुभाव पंथातील प्रवेश हा एक पूर्वसंचित योग वाटतो. सारस्वतकार वि.ल.भावे गोपाळ पंडितांचा पूर्ववृतांत

पुढीलप्रमाणे सांगतात :[१५] चक्रपाणी भट हे पैठणजवळील वरखेड गावचे राहणारे एक गृहस्थ. यांना गोपाळ व केशव अशी दोन मुले होती. थोरला गोपाळ सात महिन्यांचा जन्मला व त्याचे डोळे उघडेनात म्हणून त्यांच्या आईने त्याला श्रीचक्रधरांच्या स्वाधीन केले. योगायोगाने त्या बाळाचे डोळे उघडले व त्याला नीट दिसू लागले. तेव्हा चक्रधरांनीच त्याला "पारमांडल्य" हे नांव दिले. मोठेपणी तो महानुभाव पंथात आला. रामदेवराय जाधवाची राणी कामाई हिचा कारभारी व पुराणिक म्हणून गोपाळपंडितांनी काम केले. पारमांडल्य आम्नायाचे ते प्रवर्तक होते. कामाईसही त्यांनीच महानुभाव पंथाचा मंत्रोपदेश दिला. आनेराज बासांचा मृत्यू शके १२६२ च्या सुमारास झाल्याचा उल्लेख मालशे यांनी आपल्या ग्रंथात केला आहे.[१६] यावरून त्यांच्या साहित्याचा लेखनकाल इ.स.१३४० च्या दरम्यानचा असल्याचे स्पष्ट होते.

गोपाळ पंडित विव्दान होते. पंथनिष्ठा व पंथप्रचार करणे हीच प्रेरणा त्यांच्याही लेखनापाठीमागची होती. आपले बंधू केसोबास यांच्याबरोबर त्यांनी "सूत्रपाठ" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात श्रीचक्रधरांची वचने गोवली आहेत. यात १०11 प्रकरणे आहेत. या ग्रंथात पंथीयांस उपदेश केला आहे. "सूत्रपाठ" हा ग्रंथ गद्यात असून भाषा तत्कालीन मराठी आहे. याशिवाय आनेराजबासांनी मराठी भाषेत स्वतंत्रपणे सहा ग्रंथ लिहिले.[१७]

१. लक्षणरत्नाकर
२. सुभाषितान्ताक्षारी
३. चौपद्या
४. निर्वचनस्तोत्र
५. दृष्टांतव्याख्या
६. दृष्टांतलक्षण

यापैकी "चौपद्या" व "सुभाषितान्ताक्षारी" हे दोन पद्यग्रंथ असून बाकीचे चार गद्यात आहेत. "सुभाषितान्ताक्षरी" या ग्रंथाची रचना श्लोकबध्द निर्यमक असून रचनेत एक चमत्कृती आहे. पहिल्या श्लोकाच्या चरणाचे जे शेवटचे अक्षर आहे, त्याच अक्षराने त्याच्यापुढील श्लोकाचा प्रारंभ केलेला आहे. जणू सर्व श्लोकांचे दुवे एकमेकांत जखडून एक अतूट श्रृंखलाच त्यांनी तयार केली आहे. या सहा ग्रंथलेखनानंतर आचारस्थळ व विचारस्थळ यांचा अन्वय लावण्याच्या प्रयत्नात असताना त्यांचा मृत्यू झाला आणि त्यांचे हे काम अपुरे राहिले.

लक्षणरत्नाकराचे स्वरूप :-

गोपाळ पंडितांनी लिहिलेला "लक्षणरत्नाकर" हा ग्रंथ महानुभाव पंथाचे मीमांसाशास्त्र ठरण्यास एक महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. या ग्रंथामुळे एक व्याकरणकार म्हणूनही आनेराज बासांची ओळख मराठी वाड़मयाला होते. श्री चक्रधरांची सूत्ररूप वचने अर्थस्पष्टीकरणाच्या दृष्टीने कठीण होती. अर्थ समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांचा उलगडा कसा करावा, याचे दिग्दर्शन करण्यासाठी त्यांनी हा ग्रंथ लिहिला. "लक्षणरत्नाकर" ग्रंथ गोपाळपंडितांनी संस्कृत भाषेत लिहिला. अर्थनिर्णयासाठी सांगितलेली या ग्रंथातील बत्तीस लक्षणे मूळ मराठी भाषेतील असून चक्रधरस्वामींची आहेत. चक्रधरस्वामींनी ती म्हाइंभटाला मराठी भाषेत वर्णन करून सांगितली आहेत. म्हणून "लक्षणरत्नाकर" संस्कृत भाषेत असला तरी त्याची मूळपीठिका मराठी भाषेतील आहे. या ग्रंथाचा थोडा भाग पद्यात असून बराचसा गद्यस्वरूप आहे. आनेराजबासांनी हा ग्रंथ लिहिला त्यावेळी म्हाइंभट जिवंत होते. साहजिकच "लक्षणरत्नाकर" लिहिण्यासाठी आनेराजबासांना म्हाइंभटाचे मार्गदर्शन मिळाले असावे तसेच महानुभाव संप्रदायाचे त्या काळातील सांस्कृतिक वातावरण या ग्रंथात उतरले असावे.[१८]

प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टांत, उपपत्ती, व्यावृत्ती, विषयप्रदान, विशेषप्रबोध, उत्सर्ग, अपवाद, निषेध, न्याय, काकु, कक्षा, भावार्थ, प्रकरण, अस्तित्व, निर्देश, निर्णय, पक्ष, प्रभेद, आशंका, आक्षेप, कार्य, लक्षण, स्वरूप, कारण, हेतु, संबंध, प्रतीती, विशेषण व प्रतिष्ठा ही बत्तीस लक्षणे "लक्षणरत्नाकरा"त सूत्रांचा अर्थनिर्णय होण्यासाठी सांगितली आहेत. यापैकी पहिली सोळा लक्षणे प्रबोधात्मक असून नंतरची सोळा संबंधात्मक आहेत. आनेराजबासांनी या बत्तीस लक्षणांच्या व्याख्या सांगून पोटभेदही सांगितले आहेत. या लक्षणांवर थोडक्यात भाष्यही याच ग्रंथात त्यांनी केले आहे. बहुतांशी लक्षणांत चक्रधरांच्या वचनांचे दाखले लावून दाखविण्याचा प्रयत्नदेखील या ग्रंथात केला आहे.

अल्पाक्षरत्व व सूत्रात्मकता ही आनेराजबासांच्या शैलीची वैशिष्टये "लक्षणरत्नाकरा" दिसून येतात. आनेराजबासांच्या स्वतंत्र प्रतिभेचा प्रत्यय या ग्रंथात येतो. तर्कशास्त्र, न्यायशास्त्र, व्याकरण, मीमांसा, साहित्यशास्त्र इ. चौदा परिभाषेची स्थाने आनेराजबासांनी उपयोजिली आहेत. "लक्षणरत्नाकर" ग्रंथ म्हणजे या ग्रंथानंतरच्या भाष्यग्रंथाचा पाया असल्याने त्याला महानुभाव पंथात विशेष महत्त्व आहे. एक "व्याकरणप्रबंध" म्हणूनही

आनेराजबासांच्या या देणगीला प्राचीन मराठी वाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे· हा ग्रंथ केवळ आठ-दहा पानांचा असला तरी त्याची मूर्ती लहान पण किर्ती महान आहे·

आनेराजाचा हा ग्रंथ संस्कृत भाषेत असल्यामुळे तो मराठी भाषेतून उलगडून दाखविण्यासाठी त्यावर तीन टीकात्मक ग्रंथ लिहिले गेले·

१. बत्तीस लक्षणाची टीप,

२. बालबोधिनी व्याख्या आणि

३. व्दात्रिंशल्लक्षण टीका

या तीन टीपग्रंथामुळे लक्षणरत्नाकरातील विषयांचे आकलन व उलगडा होऊ शकतो· श्री चक्रधराच्या वचनांचा अन्वय लावण्याची प्रक्रिया लक्षात येते· "बत्तीस लक्षणाची टीप" या विस्तृत ग्रंथ लिहिणारा लेखक शके १५६३ मधील तृतीय भीष्माचार्य असावा, असे मत श्री·ह·ना·नेने आणि डॉ·य·खु·देशपांडे यांनी व्यक्त केले आहे·[१९] लेखकाने या ग्रंथात "लक्षणरत्नाकर" ग्रंथातील संस्कृत भाषेतील काठिण्य कमी करून लेखनविषय सोपा करून मांडला आहे· लक्षणव्याख्या, लक्षणांची उदाहरणे आणि प्रत्येक लक्षणाची चिकित्सा या वैशिष्टयांनी युक्त हा ग्रंथ आहे· "बालबोधिनी व्याख्या" या दुस-या टीपग्रंथाचा लेखक शिवराजशिष्य महादेवमुनी असून त्याने ही उपलब्ध पोथी शके १६६४ मध्ये पारमांडल्य या सांकेतिक भाषेत लिहिली आहे·[२०] "व्दात्रिंशल्लक्षण" हा तिसरा टीपग्रंथ शारंगधर पुसदेकर यांचा असून तो १५ व्या शतकात लिहिला गेला आहे· "लक्षणरत्नाकरा"च्या अर्थनिर्णयासाठी वरील तीन ग्रंथाची मराठी भाषेत निर्मिती झाली· या टीपग्रंथांनी मराठी भाषेला अपूर्ण प्रौढी, गहनता व प्रतिष्ठा आणली·

**पं·भीष्माचार्य :-**

"पंचवार्तिक"कार पं·भीष्माचार्यांचा परिचय पहिल्या प्रकरणात आलेला आहेच· काशीहून महाराष्ट्रात आलेल्या एका कुटुंबातील हा भीष्माचार्य रामदेवराय यादवाच्या दरबारातील एक प्रसिध्द विव्दान व पंडित होता· पं·भीष्माचार्यांनी एकूण २९ ग्रंथांची देणगी मराठी वाङ्मयाला दिली· "नामविभक्ती" व "पंचवार्तिक" या दोन ग्रंथातून त्यांनी तत्कालीन मराठीचे भाषाशास्त्र व व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न केला· "पंचवार्तिक" या त्यांच्या ग्रंथावरून माहीत होते की, महानुभाव पंथातील ग्रंथकारांनी व्याकरणशास्त्रावर विचार केला होता· आजचे व्याकरण व सातशे वर्षापूर्वीचा तेराव्या शतकातील "पंचवार्तिक" हा व्याकरणग्रंथ पाहिल्यास, त्या काळात व्याकरणशास्त्रावर पं·भीष्माचार्यांनी केलेला हा

विचार किती प्रगत होता हे लक्षात येते· "पंचवार्तिक" ग्रंथाच्या परिचयातून हे अधिक स्पष्ट होते·

पंचवार्तिक :-

तेराव्या शतकात महानुभाव पंथातील अनेक पंडित लेखक संस्कृत भाषेतील वाङ्मयासारखे दर्जेदार वाङ्मय मराठी भाषेतही निर्माण करू पाहत होते· अशा पंडितांपैकीच भीष्माचार्य हे एक होत· श्री चक्रधरांच्या सूत्रांच्या भाषेची पध्दती समजावून देऊन त्यायोगे सूत्राचा शब्दार्थ अधिक स्पष्ट व्हावा, या उद्देशाने भीष्माचार्यांनी "पंचवार्तिक" या व्याकरण-ग्रंथाची उभारणी केली· "शब्दांचे वर्गीकरण करणे" हा व्याकरणशास्त्राचा आत्मा समजला जातो· त्याला अनुसरूनच सूत्रशब्दांचे वर्गीकरण पंचवार्तिकात भीष्माचार्यांनी मांडले आहे· पंचवार्तिकात सूत्रलक्षण, सूत्रप्रकृतिलक्षण, सूत्रकारक लक्षण, सूत्रव्याख्यानलक्षण व सूत्रस्वरूपलक्षण अशी पाच प्रकरणे आहेत·

१. "सूत्रलक्षण" या पहिल्या प्रकरणात §अ§ वचन, §आ§ वाक्य, §इ§ प्रकरण व §ई§ महावाक्य असे सूत्रांचे चार भेद सांगितले आहेत· या चार भेदांच्या व्याख्येतूनच त्यांची लक्षणे सांगितलो आहेत·

§अ§ वचनाचे एकपदी, व्दिपदी व त्रिपदी असे तीन भेद लेखकांनी सांगितले आहेत· पदे सलिंग, अलिंग व क्रिया अशी तीन प्रकारची असतात असे सांगून सलिंगाचे पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुसकलिंग असे तीन प्रकार सांगितले आहेत· सलिंग पदाची तीन वचने उदाहरणासह स्पष्ट करून दाखविली आहेत· पुन्हा सलिंग पदांची नाम व सर्वनाम अशी विभागणी करून त्याचे केवळ व संयुक्त असे वर्गीकरण केले आहे· केवळ पदे कृदन्त व तव्दित प्रत्ययाने सिध्द होतात तर संयुक्त पदे समासाने सिध्द होतात, हे सोदाहरण भीष्माचार्यांनी सांगितले आहे· नंतर पुढे समासाचे अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीही व व्दंव्द असे चार प्रकार करून तत्पुरुष समासाचे विभक्ति तत्पुरुष, कर्मधारय व व्दिगु असे भेद कल्पिले आहेत· यानंतर संधीविषयी माहिती सांगून नामे ही काही विशेषणे व काही विशेष्य असतात तर सर्वनामे फक्त विशेषणेच असतात असेही नमूद केले आहे· अव्ययांची माहिती उदाहरणांसह दिली आहे· यानंतर क्रियांचे सलिंगा व अलिंगा असे दोन भेद करून काळानुसार त्यांचे तीन भेद सांगितले आहेत· क्रियेची तीन वचने तसेच तीन पुरुष असतात हे सांगून क्रियेचे सकर्मक व अकर्मक असे भेद

सांगितले आहेत. त्यानंतर कर्तरी, कर्मणि व भावे अशा तीन प्रयोगांचे वर्णन केले आहे.

{आ} "वाक्यविचार" करताना पं.भीष्माचार्यांनी वाक्यांचे एकूण १५ भेद वर्णिले आहेत. ते उदाहरणांसह स्पष्ट करून सांगितले आहेत. वाक्यांचे केवळ वाक्य व संयुक्त वाक्य असे भेदही लेखकांनी केले आहेत. {इ} पहिल्या प्रकरणाच्या तिसऱ्या भागात "प्रकरण विचार" केला असून प्रकरणांचे दहा भेद सांगितले आहेत. या दहा भेदांची उदाहरणेही त्यांनी दिली आहेत. {ई} यात महावाक्यांचे दहा भेद सांगून त्यांची उदाहणे दिली आहेत.

२. दुसऱ्या प्रकरणात भीष्माचार्यांनी सूत्रप्रकृतीचे ज्ञान घेण्याची आवश्यकता प्रतिपादन करून सूत्रप्रकृतीचे दहा प्रकार सांगितले आहेत. या दहा प्रकारांचे सोदाहरण स्पष्टीकरणही त्यांनी केले आहे.

३. तिसरे प्रकरण "सूत्रकारक लक्षण" असे असून त्यात प्रथमा ते सप्तमी अशा सात विभक्ती सांगून त्यांचे अर्थ व प्रत्ययही सांगितले आहेत.

४. "सूत्रव्याख्यानलक्षण" या चौथ्या प्रकरणात पदच्छेद, पदार्थोक्ति, विग्रह, वाक्ययोजना, आक्षेप व समाधान या प्रकारांनी सूत्रांचा अर्थ कसा प्रकाशित होतो, हे सांगून एकाच सूत्रात सहा प्रकार कसे दिसतात हे सांगितले आहे.

५. "सूत्रस्वरूपलक्षण" हे पंचवार्तिकातील पाचवे व शेवटचे प्रकरण. ज्या बत्तीस लक्षणांनी सूत्रांचे भाव प्रकाशित होतात, ती बत्तीस लक्षणे उदाहरणांसह या प्रकरणात सांगितली आहेत.

"पंचवार्तिक" कोणत्या भीष्माचार्याने लिहिले हा वादाचा विषय असला तरी, महानुभाव पंथातील कोणत्यातरी भीष्माचार्यांनी ते लिहिले हे निश्चित. आजचे मराठी भाषेचे व्याकरण पाहता, शब्दांच्या जाती, वचन, लिंग, विभक्ती, संधी, समास तसेच क्रियेचे काळ, कर्माच्या अस्तित्वानुसार होणारे क्रियेचे भेद, प्रयोग इ.बाबींचा विचार "पंचवार्तिका"त केला असल्याचे दिसून येते. आजच्या शास्त्रीय व्याकरणातील या संकल्पनांचा सातशे वर्षापूर्वी केलेला हा विचार "पंचवार्तिका"ला मराठीतील "आद्य व्याकरण" म्हणण्यास निश्चितच योग्य आहे.

विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर :-

महानुभाव पंथीय वाड्मयात४ साहित्यिकांचा व्याकरणकार म्हणून उल्लेख केला जातो. श्री.आनेराज व्यास व पं.भीष्माचार्य हा दोघांचे ग्रंथ उपलब्ध असून त्यांचा थोडक्यात परिचय मागे आलेला आहे. श्री.कवीश्वर व्यास यांचा व्याकरणग्रंथ अनुपलब्ध असला तरी त्याचा नामोल्लेख पंथवाड्मयात केलेला आहे. श्री.विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर हेही महानुभावीय व्याकरणकार असल्याचा उल्लेख प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी प्र.ना. दीक्षितांच्या "मराठी व्याकरण काही समस्या" या ग्रंथाच्या पुरस्कारात केला आहे. शिवाय श्री.केळकर व श्री.तळपुळे यांनीही आपल्या ग्रंथात पंथातील एक व्याकरणकार म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे.[२१]

पं.विश्वनाथ वर्धनस्थ हे सोळाव्या शतकात होऊन गेले. ते उपाध्याय आम्नायातील असून श्री.देवेराजगुरु यांचे ते शिष्य होते. पं.विश्वनाथांनी "आचार" महाभाष्याची रचना केली. "दृष्टांतस्थळ" या दुस-या एका महाभाष्यरचनेत त्यांनी "दृष्टांतपाठा"तील प्रत्येक दृष्टांत स्पष्ट करून सांगितला आहे. पंथवाड्मयात या महाभाष्याला खूप महत्त्व आहे. तसेच हयग्रीवकृत "गद्यराजस्तोत्र" आणि पं.दामोदरकृत "चौपद्या" या दोन ग्रंथांवर त्यांचे टीकाग्रंथ आहेत. "ध्यानामृतस्तोत्र" या श्लोकबध्द ग्रंथात त्यांनी काही छंदांची अलंकारांची योजना केली आहे. पं.विश्वनाथांनी व्याकरणग्रंथ कोणता लिहिला, याचे स्पष्टीकरण मात्र निश्चितपणे मिळत नाही. "ध्यानामृतस्तोत्र" ग्रंथात छंदशास्त्रातील त्यांनी जी अलंकारयोजना केलेली आहे कदाचित या रचनेमुळेच व्याकरणकार म्हणून त्यांना संबोधिले असावे.

मराठी भाषेचे सखोल व विस्तृत व्याकरण अव्वल इंग्रजी काळात लिहिले गेले हे खरे, पण प्राचीन काळातही मराठीचे व्याकरण लिहिण्याचा महानुभावीय ग्रंथकारांनी केलेला प्रयत्न व्याकरणकारांच्या वरील माहितीवरून स्पष्ट होतो. या व्याकरणकारातील कवीश्वर व्यास यांचा व्याकरणग्रंथ उपलब्ध नाही. त्यामुळे आपल्या ग्रंथात त्यांनी व्याकरणातील नेमक्या कोणत्या अंगाचे विवेचन केले होते, हे स्पष्ट होत नाही. पं.विश्वनाथ वर्धनस्थ यांचा "व्याकरणकार" म्हणून उल्लेख केला असला तरी त्यांनी छंदशास्त्रावर विवेचन केलेले दिसून येते पण व्याकरणावरचे त्यांचे लेखन आढळून येत नाही. आनेराज बासांच्या "लक्षण-रत्नाकरा"त सूत्रांचा अर्थ प्रकाशित करण्याची बत्तीस लक्षणे त्यांनी सांगितली आहेत.

तर पं·भीष्माचार्यांनी आपल्या "पंचवार्तिक" ग्रंथातून व्याकरणातील ब-याच संकल्पनांचे विवेचन केले आहे·

"भीष्माचार्याने संस्कृत व्याकरणावरूनच "पंचवार्तिकातील" व्याकरणज्ञान मांडले आहे व व्याकरणाचा काही किरकोळ भाग त्यात आला आहे,"[22] अशी टीका भीष्माचार्यांवर केली जात असली तरी मराठी भाषेतील व्याकरण लिहिण्याचा पहिला मान महानुभावीय व्याकरणकारांना द्यावा लागतो· कारण पंथवाङ्मयापूर्वीचे मराठी वाङ्मय कोठे आढळत नाही· व्याकरणाचा किरकोळ का होईना, काही भाग पं·भीष्माचार्यांनी लिहिला हे टीकाकारांनीच कबूल केले आहे· त्यामुळे ज्या काळात ग्रंथलेखनासाठी संस्कृत भाषेचे महत्त्व मानले गेले होते, अशा काळात मराठी भाषेला धर्मभाषेचा दर्जा देऊन कोणत्या का उद्देशाने होईना, महानुभावीयांनी व्याकरणलेखन करण्याचा केलेला प्रयत्न मराठी वाङ्मयात निश्चितच उपकारक मानावा लागतो·

## :::: संदर्भ ::::


१. प्र·ना·दीक्षित, **मराठी व्याकरण काही समस्या**, सातारा,१९७५, पृ· ७.

२. तत्रैव, पृ· ३.

३. तत्रैव, पृ· ३.

४. तत्रैव, पृ· १०.

५. सु·बा·कुलकर्णी, "परिशिष्ट क्र·2", **मराठी व्याकरणाची मूलतत्वे**, द·के·केळकर व शं·गो·तुळपुळे, चौ·आ·पुणे, १९६६ , पृ·२९१ । २९२.

६. य·रा·दाते व चिं·ग·कर्वे §संपा·§, **महाराष्ट्र शब्दकोश**, विभाग सहावा, न·आ·, पुणे १९८८, प्रस्ता·पृ·५.

७. सु·बा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· २९०.

८. य·रा·दाते व चिं·ग·कर्वे, उ·नि·, प्रस्ता·पृ· ?.

९. शं·गो·तुळपुळे, §पुरवणी§, **महाराष्ट्र सारस्वत** §पुरवणी§, पा·आ·, मुंबई, १९६३, पृ·६९७.

१०. अ·ना·देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग पहिला, पूर्वार्ध, पुणे १९६६, पृ·४४९.

११. प्र·न·जोशी, **मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास**, प्राचीन काळ, सु·दु·आ·, पुणे,१९७८ , पृ·१४७.

१२. शं·गो·तुळपुळे, उ·नि·, पृ·६९८.

१३. व·स·जोशी, **महानुभाव संत**, पुणे, १९७२ , पृ· १०८.

१४. य·रा·दाते व चिं·ग·कर्वे, उ·नि·, प्रस्ता·, पृ·२.

१५. वि·ल·भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, पा·आ·, मुंबई,१९६३ , पृ· ८८.

१६. भीमराव कुलकर्णी, "महानुभावीय वाङ्मय", **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड दुसरा, भाग पहिला, स·ग·मालशे §संपा·§, पुणे,१९८२ , पृ·५०८.

१७. वि·ल·भावे, उ·नि·, पृ· ८८.

१८. उषा मा·देशमुख, **साहित्यमुद्रा**, मुंबई, १९९०, पृ· ४३.

१९. तत्रैव, पृ· ४२.

२०. भीमराव कुलकर्णी, उ·नि·, पृ· ५१२.

२१. सु·बा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· २९१.

२२. भीमराव कुलकर्णी, उ·नि·, पृ· ५१०.